Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

Original Article

संत तुकारामांचे कार्य आणि कर्तृत्व

श्री. भागवत तुकाराम देशमुख
संशोधन विद्यार्थी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
Email: dbhagwat8@gmail.com

Manuscript ID:
JRD -2026-180725
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 7
Pp. 126-128
July- 2026
Submitted: 16 June. 2026
Revised: 26 June. 2026
Accepted: 11 July. 2026
Published: 31 July. 2026

सारांश

संत तुकाराम हे मराठी संतसाहित्यातील महान संतकवी असून त्यांनी अभंगांच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य केले. त्यांनी अंधश्रद्धा, दांभिकपणा व भोंदूगिरीचा निषेध करून विवेकनिष्ठ भक्तीचा पुरस्कार केला. शेती, कर्तव्यनिष्ठा आणि दैनंदिन जीवनातील उदाहरणांद्वारे अध्यात्मिक मूल्ये समाजापर्यंत पोहोचवली. तसेच आदर्श लोकप्रतिनिधी, प्रशासन, सैनिक आणि राजधर्म यांविषयी मार्गदर्शन करून नैतिक, न्यायप्रिय व लोककल्याणकारी शासनाची संकल्पना मांडली. संत तुकारामांचे विचार आजही सामाजिक, नैतिक आणि आध्यात्मिक जीवनासाठी मार्गदर्शक ठरतात.

मुख्य शब्द: *संत तुकाराम, अभंग साहित्य, समाजप्रबोधन, अंधश्रद्धा निर्मूलन, विवेकनिष्ठ भक्ती, शेतीनिष्ठ जीवन, राजधर्म, लोकप्रतिनिधी, नैतिक मूल्ये, वारकरी संप्रदाय*

प्रस्तावना -

महाराष्ट्रात संतांची मांदियाळी खूप मोठी आहे. त्यातही संत तुकारामांचे नाव लहानापासून थोरापर्यंत गेली चारशे वर्ष सर्वतोमुखी दुमदुमून राहिले आहे. संत साहित्य हे मराठी साहित्य विश्वाचा अविभाज्य घटक आहे. संत काव्य ही फक्त एक रचना नसून ती संतांची समाजाप्रती असलेली आंतरिक तळमळ आहे. संत साहित्याचा अभ्यास करताना संत तुकारामांचे बहुआयामी व्यक्तिमत्त्व असल्याचे दिसून येते. संत तुकारामांचे व्यक्तिमत्त्व, जीवननिष्ठा, पंथनिष्ठा, इत्यादी घटक आपल्याला अभ्यासता येतात. मानवता धर्माच्या क्षेत्रात भक्तीयोगाचा साधा पण तेजस्वी कळस तुकारामांनी चढविला तो अभंग काव्याच्या माध्यमातून. संत तुकारामांच्या ग्रंथाच्या आधारे त्यांच्या पारमार्थिक जीवनाचा अभ्यास केल्यास असे दिसून येते की, त्यांच्या जीवनात वैयक्तिक अनेक विशेष आहेत. पूर्ण संतपण अंगी बाणल्यावरच त्यांनी समाजास उपदेश केला. परंतु समाजास दिशा दाखवण्यासाठी व्यक्तिगत अध्यात्मिक जीवन उन्नत होण्यासाठी साधकास कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे याचा प्रथमतः अभ्यास केला व त्यानंतर अभंग काव्याच्या माध्यमातून समाजाशी संवाद साधण्याचा प्रयत्न केला. संत तुकारामांच्या लोकसंवादाचे मूळ त्यांच्या अभंगातून दिसून येते. लोकसंवाद साधत असताना समाजातील सर्वच प्रश्न त्यांच्या समोर होते. भविष्यात निर्माण होणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देखील त्यांनी त्याच वेळी देऊन ठेवली यातून त्यांचा असलेला व्यापक दृष्टीकोन दिसून येतो. त्यानुषंगाने संतांच्या वाङ्मयातील विविध पैलूंपैकी संत तुकारामांनी त्यांच्या अभंग काव्यातून आजच्या परिस्थितीत निर्माण झालेल्या प्रश्नांवर योग्य मार्गदर्शन केले तेच आपण इथे अभ्यासणार आहोत.

अंधःश्रद्धेचा निषेध

समाजातील अंधःश्रद्धा ही संत तुकारामांच्या काळातही तेवढीच होती जेवढी आता आहे. त्याकाळी दांभिक, दुराचारी, टवाळ, ढोंगीपणा, बुवाबाजी करणाऱ्या लोकांमुळे ती वाढत चाललेली होती. अंधःश्रद्धेचे निर्मुलन सर्वच संतानी केलेले पाहायला मिळते. परंतु तुकारामांच्या भाषेतील अंधःश्रद्धेवरील ओरखडे हे तीक्ष्ण बाणा प्रमाणे आहेत. संत तुकारामांनी ते अभंगातून दर्शविले आहे.

Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)
This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.

Address for correspondence:
श्री भागवत तुकाराम देशमुख संशोधन विद्यार्थी, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

How to cite this article:
देशमुख, भागवत. तुकाराम. (2026). संत तुकारामांचे कार्य आणि कर्तृत्व. Journal of Research and Development, 18(7), 126–128. https://doi.org/10.5281/zenodo.21942945

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21942945
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

नवसे कन्या पुत्र होती | तरी कां करणे लागे पती || (तु.गा.अ.क्र.१८७पृ.क्र.३३)

नवस सायास केल्याने संततीचे सुख मिळत नाही. त्यामुळे भोंदुगिरी करणाऱ्या देवाच्या भगत लोकांच्या नादी लागू नये. दगडाला लोक सेंदूर फासतात, त्याचा देव करतात आणि त्याला नवस बोलतात. आणि बायकोला गाडीला बांधून तिला देवापुढे उभा करतो परंतु त्याबाईला हरिकथेला जाऊ देत नाही.

दगडाच्या देवा बगाडी नवस | बाईल कथेस जाऊ नेदी || (तु.गा.अ.क्र.२७२७पृ.क्र.४५४)

अशी असलेली ही दैवते आपल्या पोटासाठी रडतात आणि लोकांकडे शीत भात मागतात आणि आपल्या इच्छेसाठी लोकांना पिडा देतात. ते तुम्हाला काय देणार असा सवाल देखील संत तुकाराम करतात.

सेंदरी हेंदरी दैवते | कोणती पूजी भुते खेते |
आपुल्या पोटा जी रडते | मागती शिते अवदान ||
आपुल्या इच्छे आणिका पीडी | काय ते देईल बराडी ||
(तु.गा.अ.क्र.४०२६पृ.क्र.७३१)

देव अंगात आला म्हणून डोक्याचे केस सोडून नाचणाऱ्या, अंगात येणाऱ्या लोकांसाठी संत तुकाराम म्हणतात,

अंगी दैवत संचरे | मग तेथे काय उरे || (तु.गा.अ.क्र.१८७पृ.क्र.३३)

तुकारामांनी समाजाला डोळस भक्ती शिकवली चुकीच्या कल्पना व अंधःश्रद्धा यांना त्यांनी कधीच खतपाणी घातले नाही. देवाच्या नावाखाली लोकांना लुटणाऱ्या चुकीच्या मार्गाला लावणाऱ्या सर्वांचा समाचार त्यांनी घेतला. अशा दैवतांचा वारकरी संतानी सतत निषेध केला आहे. अशी असलेली क्षुद्र दैवते व त्यांचा समाजजीवनावर असलेला पगडा याविषयी उदाहरणादाखल म.श्री.माटे म्हणतात,१ "वारकरी पंथांच्या संतानी तसेच रामदासांनी या देवतांना क्षुद्रदेवता संबोधून त्यांचा वारंवार निषेध केला आहे. या निषेधवचनांची पुनरुक्ती आणि त्याची धार लक्ष्यात घेतली तर या क्षुद्र देवतांचा समाजजीवनावर केवढा पगडा मध्ययुगात होता हे स्पष्ट होते. आजही तो तेवढाच दृढ आहे." देवर्षी, करणी, भानामती, जादूटोणा, मंत्र तंत्र, यावरच समाजाचा विश्वास असल्याकारणाने दुष्काळ, पूर, महामारी, परचक्र सारख्या गोष्टींना देवतांचा कोप समजला जाई. अंधःश्रद्धेला म्हणजे जिला कोणताही वैज्ञानिक आधार नाही तीच लोकरुड मानली जात असे. तसेच हिंदू तुर्क संवादातून देखील तुकारामांनी देवतांच्या अवडंबरावर टीका केलेली आहे.

शेतीनिष्ट व्यवहारातून अध्यात्मिक उपदेश

शेती हा महाराष्ट्र मधील लोकांचा प्रमुख व्यवसाय होता आणि आहे. व्यवसायातील कर्तव्यनिष्ठेला महत्त्व देताना संत तुकाराम उपदेश करतात की, पेरणीच्या वेळी किंवा शेतीच्या कामच्या वेळी जर कोणाचा मृत्यू झाला तर पेरणी कापणी सारखी कामे थांबवावी लागतात. तर निसर्गाच्या नियमाप्रमाणे चालावे आपल्यासाठी निसर्ग थांबत नाही आपण आपली कामे आधी करून घ्यावी असे सांगितले आहे.

मढे झाकोनीया करावी पेरणी | कुणबीयाची वाणी लवलाहे || (तु.गा.अ.क्र.४५७पृ.क्र.७६)

शेतकऱ्यांना शेतीनिष्ठ असावे यासाठी संत तुकारामांनी काही गोष्टी सांगितल्या आहेत. शेतामध्ये पीक घेत असताना काय केले पाहिजे सुगीचे दिवस आल्या नंतर शेतकऱ्यांनी कसे जागरूक राहिले पाहिजे हे देखील सांगितले आहे. शेतातील पिका संबंधी संत तुकाराम अभंगातून कर्तव्य सांगतात.

सेत आले सुगी सांभाळावे चारी कोण | पिक आले परी केले पाहिजे जतन ||
सोंकरी सोंकरी सोहंकरी | विसावा रोवारी नको उभे आहे तो ||
गोफनीसी गुंडा घाली पागोऱ्याच्या नेटे | पळती आहाकारे अवघी पाखरांची थाटे ||
खळे दाणे विश्वसुख करी होता रासी | सारा सारुनिया ज्याचे भाग देई त्यासी ||
(तु.गा.अ.क्र.८१५पृ.क्र.१३६)

या अभंगाचा वाच्यार्थ घेतला तर शेतीशी संबंधी कर्तव्य आपल्याला दिसतात. सुगीला आलेल्या शेताची कशी राखण करावी, पिकांचे जतन कसे केले पाहिजे, पिकांवर आलेल्या पाखरांना हाकलून दिले पाहिजे परंतु पिकवलेल्या पिकांचे भाग ज्याच्या त्याच्या वाटणीचे दिले पाहिजे असे देखील सांगतात.तर अध्यात्मिक दृष्ट्या वरील अभंगाचा चार कोण म्हणजे मन, बुद्धी, देह, आणि प्राण सोहंम म्हणजे तो परमात्मा मी आहे, गोफण म्हणजे वाणी आणि गुंडा म्हणजे नामस्मरण, वोनव्या म्हणजे बेसावध, सोंकरी म्हणजे राखण करणारा, आणि शेवट ज्याचा सारा त्याला देणे म्हणजे पंचमहाभूताकडून आलेले हे शरीर पंचमहाभूतात विलीन करा. व्यक्तीचा आत्मिक उध्दार व्हावा या साठी शेतीशी संबंधित कामांचे रूपक संत तुकाराम योजतात म्हणजे त्याकाळचा बराचसा समाज हा शेतीवर अवलंबून आहे हे त्यांना माहित होते. म्हणूनच त्यांच्या भाषेत समजेल असे उदाहरण संत तुकाराम देतात. तर बेसावध असलेल्या माणसाचे शेत पाखरे खाऊन टाकतात हे पण सांगतात,

वोंनव्या सोंकरी | सेत खादले पाखरी || (तु.गा.अ.क्र.८१४पृ.क्र.१३६)

तुकारामांनी सांगितलेला राजधर्म
लोकप्रतिनिधींची निवड व आचारधर्म

राज्याचे लोकप्रतिनिधी कसे निवडावे हे देखील संत तुकाराम अभंगातून सांगतात. कोणाकडे सत्ता द्यावी राज्याचा रक्षक कसा असावा. त्यासाठी त्याच्याकडे शुद्ध आचार विचार आहेत का? हे पाहिले पाहिजे.कोणाच्या हातात सत्ता द्यावी कोणाच्या हातात नको हे संत तुकाराम सांगतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-7| July-2026

अविचाऱ्याच्या हाती | देऊनी प्रजा नागविती || **(तु.गा.अ.क्र.३२४५पृ.क्र.५४१)**

राज्याचा लोकप्रतिनिधीचे परीक्षण करूनच त्याचा आचार विचार पाहुणच त्याची निवड करावी असे संत तुकाराम सांगतात.

परिक्षावे कोण राज्याचे रक्षक | विवेक विवेक पाहुनिया ||

आचार धर्म हा कायद्यापेक्षा अधिक महत्वाचा आहे. कायदा करून लोकांचा आचारधर्म शिकवण्यापेक्षा शुद्धआचरण हेच समाजउद्धारासाठी महत्वाचे आहे. कारण लोकांची याला मान्यता असते "नैतिकदृष्ट्या हे बरोबर असल्यामुळे त्याचे उल्लंघन करणे म्हणजे चूक मानली जाते. वर्तमानातील बरोबर किंवा चूक ठरविण्याचे आचार संप्रदाय एक साधन असल्यामुळे समाज जीवनात आचार संप्रदायांना अतिशय महत्वाचे स्थान आहे."[२] असे मत तानाजी पाटील 'समाजजीवनातील तुकाराम' या त्यांच्या ग्रंथात व्यक्त करतात. चुकीच्या माणसाच्या हातात राज्य आले तर पूर्वाश्रमीचाच त्याचा व्यवहार तो राज्याच्या माध्यमातून करतो हे सांगायला संत तुकाराम चुकले नाहीत

जरी आले राज्य मोळविक्या हाती | तरी तो मागुता व्यवसायी ||

(तु.गा.अ.क्र.१४०२पृ.क्र.२३४)

सैनिक कसे असावेत

प्रशासन चालवत असताना राज्यकर्त्याला सहकारी सेवक अथवा कसा असावा हे तुकारामांनी पाईकीच्या अभंगातून सांगितले आहे ते म्हणतात.

जीवाचे उदार शोभती पाईक | मिरवती नाईक मुगुटमणी ||

(तु.गा.अ.क्र.३६३४पृ.क्र.६०९)

तरी व्हावे पाईक जीवाचा उदार | सकळ त्याचा भार स्वामी वाहे ||

(तु.गा.अ.क्र.३६२९पृ.क्र.६०८)

सेवक हा जीवावर उदार असावा तरच तो राज्याचे व राज्याच्या स्वामीचे हित करू शकतो.

प्रशासन अधिकारी कसे असावेत

राजा व प्रजा यातील दुवा म्हणजे राज्याचे प्रशासन अधिकारी असतात. ते कसे असावे या विषयी तुकाराम सांगतात.

निंदक दुर्जन संग्रही असती | त्याची युक्ती चित्ती आणू नका ||

राजाचे यशापयश हे या अधिकाऱ्यांवर असते म्हणून सद्गुणी अधिकारी राजाने जवळ करावे असे संत तुकाराम सांगतात. कान भरणारे, निंदक, दुर्जन अधिकारी राज्यव्यवहारामध्ये नसावे तसेच ते विश्वासू असावेत.

विश्वासावाचुनी पाईकासी मोल | नाही मिथ्या बोल बोलालीया ||

(तु.गा.अ.क्र.३६३३पृ.क्र.६०९)

तर संत तुकारामांनी अन्याय अनीती भ्रष्ट असलेल्या राज्यकर्त्यांचा निषेध अभंगामधून नोंदविला आहे.

राजा प्रजा पीडी | क्षेत्री दुश्चितासी तोडी ||

बैसोनिया तक्ता | अन्याये पीडिती लोका ||

(तु.गा.अ.क्र.१४४पृ.क्र.२६)

"राज्य कारभार विषयक लोक व्यवहाराचे स्वरूप, आदर्श राजनीति, राज्यशासकाची जबाबदारी, जनतेची तत्संबंधी धारणा, प्रशासन अधिकाऱ्यांची प्रामाणिक वृत्ती इ. संबंधी तुकोबाराय फारच साक्षेपी विचारवंत ठरले"[३] असे मत रामकृष्णदास लहवितकर त्यांच्या 'भाग्य आम्ही तुका देखियेला' या ग्रंथात व्यक्त करतात.

संत म्हटले की संसाराचा वीट आलेला अरण्यात जाऊन किंवा गुहेत बसून फक्त देवाची ओढ लागलेला असा एखादा व्यक्ती असा काहींचा समज आहे. परंतु या मताला छेद देण्याचे काम संत तुकारामांनी त्यांच्या अभंग काव्यातून केले. प्रपंच करून परमार्थ कसा साधावा याचे उदाहरण म्हणजे तुकारामांचे जीवन चरित्र होय. मानवतावाद व ईश्वर निष्टेबरोबर समाजातील वास्तव मांडण्याचा प्रयत्न करून त्यावर उपाय सांगितले. समाजाला आदर्श जीवन जगण्याचे संकेत त्यांनी अभंगातून दिले. अभंगाद्वारे सामुदायिक व व्यक्तीशः केलेले उपदेश हा चिंतनीय विषय आहे.

संदर्भ सूची -

1. माटे म.श्री., 'मध्ययुगीन महाराष्ट्र सामाजिक आणि सांस्कृतिक जीवन', प्रथम आवृत्ती, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००२ ,पृष्ठ क्र.३३
2. पाटील तानाजी, 'समाजजीवनातील तुकाराम', प्रथम आवृत्ती,पद्मगंगा प्रकाशन, पुणे,२००८, पृष्ठ क्र. ६७
3. लहवितकर रामकृष्णदास, ' भाग्य आम्ही तुका देखियेला', प्रथम आवृत्ती,आचार्य रामकृष्णदास लहवितकर ट्रस्ट, नाशिक,२०१२, पृष्ठ क्र.२४९

संदर्भ गाथा सूची –

शिरवळकर धों.तु. व कराडकर बंडाबुवा(संपा.),'श्री तुकाराम गाथा', द्वितीय आवृत्ती, संत वाङ्मय प्रसारक मंडळ, कराड,१९९७

संक्षेप सूची -

तु.गा. - श्री तुकाराम गाथा